नमुं मनपा क्षेत्रात मातृ वंदना सप्ताहला सुरुवात

वाशी : केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री मातृ वंदन योजना संपूर्ण देशभरात राबविण्यात येत आहे. १ सप्टेंबर पासून ७ सप्टेंबर या कालावधीत या योजनेची माहिती व्यापक स्वरूपात प्रसारित करण्यासाठी तसेच पात्र लाभाथ्यांची नोंदणी करण्यासाठी 'मातृ वंदना सप्ताह' राबविला जात आहे. या अंतर्गत पात्र लाभाथ्यांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी PMMVY-CAS पोर्टलवर करणे तसेच एएनएम, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांच्यामार्फत योजनेची माहिती लाभाथ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या निर्देशानुसार मातृ वंदना सप्ताह प्रभावीपणे राबविण्यात येत असून सप्ताह कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत यापूर्वीच सर्व नागरी आरोग्य केंद्रांमार्फत एएनएम, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांना माहिती व प्रशिक्षण देण्यात आले आहे. मातृ वंदना

सप्ताहाचा प्रारंभ सर्व विभागांमध्ये गर्भवती मातांना पोषक आहारासंबंधीत मार्गदर्शन करून तसेच प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची माहिती देऊन करण्यात आला. केंद्र सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयामार्फत १ जानेवारी २०१७ पासून निकषानुसार पात्र लाभाथ्यांकरिता प्रधानमंत्री मातृ वंदना योजना कार्यान्वित केलेली आहे. या अंतर्गत पात्र लाभार्थी महिलेला रु. ५ हजार इतकी रक्कम रु. १ हजार, रु.२ हजार व रु. २ हजार अशी तीन टप्प्यात देण्यात येणार असून सदर रक्कम लाभार्थी महिलेच्या आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफिसमधील खात्यात जमा केली जाणार आहे.

माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी हा योजनेचा मुख्य उद्देश असून याव्दारे जन्माला येणा-या नवजात बालकाचेही आरोग्य सुधारावे आणि माता मृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन तो नियंत्रित रहावा हे ध्येय नजरेसमोर ठेवण्यात आलेले आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेने २१ हजार २२७ अपेक्षित लाभाथ्यांपैकी १८ हजार ४५७ लाभाथ्यांना या योजनेचा लाभ दिला असून ८६.९५ टक्के इतके उद्दीष्ट साध्य केले आहे. महानगरपालिकेच्या सर्व २३ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी तसेच माता बाल रुग्णालय व सार्वजनिक रुग्णालय यांचे वैद्यकीय अधिक्षक यांची विशेष बैठक आयोजित करून कोणतीही लाभार्थी महिला या योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहू नये याकरिता दक्षतेने लाभार्थ्यांचा शोध घेण्यात यावा तसेच त्याची पोर्टलवर नोंदणी करण्यात यावी असे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्यामार्फत देण्यात आले असून त्यानुसार आरोग्य विभागामार्फत 'मातृ वंदना सप्ताह' उत्साहाने राबविण्यात येत आहे.

भिवंडीत जिजाऊ संस्थेकडून मोफत वाचनालयांचे लोकार्पण !

भिवंडी : राज्यभरात सामाजिक उपक्रमात अग्रेसर असलेल्या जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण कोकणातील ५ जिल्ह्यांमध्ये ३४ ठिकाणी मोफत वाचनालय सुरू आहेत. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे ह्यांची कन्या तेजस्विनी सांबरे हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भिवंडीच्या ग्रामीण भागातील खारबांव, माणकोली, कोनगांव या तीन महत्वाच्या ठिकाणी जिजाऊ संस्थेच्या मोफत वाचनालयांचे लोकार्पण करण्यात आले.

₹ माझ्या ग्रामीण भागातील विद्यार्थी हा फक्त तलाठी न होता कलेक्टर झाला पाहिजे, क्लार्क न होता तहसिलदार झाला पाहिजे, आपल्या कोकणाच्या भूमीत कोकणचाच अधिकारी असला पाहिजे ₹ हे निलेश सांबरे ह्यांच स्वप्न आहे. जिजाऊ एमपीएससी/युपीएससी अकॅडमीच्या माध्यमातून १०० हुन अधिक विद्यार्थी विविध शासकीय सेवेमध्ये दाखल झाले आहेत. युपीएससी मेन्स परिक्षेपर्यंत एका विद्यार्थ्यांची झेप,कल्पेश जाधव यांची तहसीलदार, नितीन कांतीलाल हरड यांची नायब तहसीलदारपदी निवड तसेच ललीत चिंतामण मौळे, यांची एसटीआय (राज्य कर निरीक्षक अनुसूचित जमातीमधुन राज्यात प्रथम) अधिकारीपदी निवड झालेली आहे. कृष्णा मारुती फडतरे यांची उप शिक्षणाधिकारीपदी निवड तसेच इतर विद्यार्थ्यांची सेल टॅक्स, कृषी सेवक, ठाणे न्यायालय,मंत्रालय,रेल्वे प्रशासन आदी कार्यालयात अधिकारी पदावर निवड झालेली आहे तर ठाणे,पालघर,रायगड - पेण व माणगांव, रत्नागिरी - खंडाळा, सिंधुदुर्ग - सावंतवाडी आदी मुख्य ३४ ठिकाणी सार्वजनिक मोफत वाचनालये सुरु आहेत. सुमारे २ हजार ५०० विद्यार्थी या वाचनालयांचा लाभ घेत आहेत.भिवंडीत नवीन तीन वाचनालयांचा शुभारंभ झाल्याने ही संख्या ३७ वर पोहोचली आहे. खारबांव, माणकोली, कोनगांव या भिवंडीतील महत्वपूर्ण ठिकाणी वाचनालय मोफत वाचनालये सुरू झाल्याने ग्रामीण भागातील मुलांना त्याचा नक्कीच मोठ्या प्रमाणात फायदा होईल. तिन्ही गावातील व परिसरातील ग्रामस्थांनी या प्रसंगी जिजाऊ संस्थेचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाप्रसंगी उदघाटक म्हणून जिजाऊ संस्थेच्या ठाणे जिल्हा प्रमुख मोनिका पानवे, प्रकाश पाटील(नायब तहसीलदार)यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडला. तर प्रमुख पाहुणे म्हणून चिंतामण पाटील - (सरपंच - दापोडे), राजेश पाटील - (समाजसेवक),डॉ.रुपाली कराले (सरपंच - कोनगांव), अश्विनी पाटील(पोलीस पाटील), माजी पं.स.सदस्या शोभा म्हात्रे, समाजसेवक सुरेश पाटील, तपण पाटील,ओम (भाऊ) मुकादम आदींसह जिजाऊ सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भिवंडीत एक मजली घर कोसळून एक ठार तर आठ जण जखमी

भिवंडी : भिवंडी शहरातील आजमी नगर,टिपू सुलतान चौक परिसरात असलेली एक मजली इमारत कोसळल्याची घटना शुक्रवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास घडली आहे. या दुर्घटनेत एक जणाचा मृत्यू तर आठ जण जखमी झाले आहेत.

मोहम्मद तबरेज अंसारी (४० रा. आजमीनगर ,झोपडपट्टी) असे दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यू झालेल्या इसमाचे नाव आहे.तर मो.हसीम शेख (३५),सुबेदा खातून (५५),अमिना अन्सारी (४५),रोशन बानो (३०), जारा अब्दुल कलाम (१२), रोजी फातिमा (१४), जिकरा अंसारी (१४),आयशा शब्बीर अंसारी (५५)अशी जखमींची नावे आहेत.शहरातील आजमीनगर,टिपू सुलतान चौक परिसरात शासनाने १९८४ च्या दंगलीत विस्थापित झालेल्या नागरिकांना १० x १० च्या मोजमापाचे घर शब्बीर मो.इब्राहिम अंसारी यांना राहण्यासाठी दिले होते.

मार्केट परिसरात असलेल्या या घराच्या आजूबाजूला शब्बीर यांनी घराच्या गॅलेरीवर वाढीव अधिकृत बांधकाम केले होते.

या इमारतीच्या खाली किराणा दुकान तसेच इतर भाजीपाल्याची दुकाने आहेत.मार्केट परिसर व दुकाने असल्याने या ठिकाणी नागरिक सामान खरेदीसाठी आले होते.त्यावेळी वाढीव गॅलेरी व घराचा भाग सामान खरेदीसाठी आलेल्या मोहम्मद तबरेज अंसारी (४० रा.आजमीनगर) व अन्य नागरिकांवर कोसळला.त्यामुळे कोसळलेल्या घराच्या मलब्याखाली मो.तबरेज दबला गेल्याने तो जागीच ठार झाला तर आठ जण जखमी झाले आहेत.यातील गंभीर जखमी झालेल्या हाशीम आणि सुबेदा यांना कळवा येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे तर अमिना यांच्या डोक्याला व रोशन हिच्या पायाला व पाठीला फ्रॅक्चर झाल्याने त्यांच्यावर शहरातील स्व. इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उर्वरीत जखमींवर प्राथमिक उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले आहे. विशेष म्हणजे या दुर्घटनेत अंसारी कुटुंबीय सकाळची न्याहारी करण्यासाठी किचन रूममध्ये बसले होते.त्यामुळे घरातील कोणीही जखमी झाले नाही. मार्केट व दुकानात खरेदीसाठी आलेले नागरिक व महिला दुर्घटनेत मयत व जखमी झाले आहेत.जखमींना शहरातील स्व इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये तिघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.घटनास्थळी अग्निशमन दल,पोलीस व आपत्ती व्यवस्थापन बचाव पथक दाखल होत मदतकार्य सुरू करण्यात आले आहे.

भोईवाडा पोलीस ठाण्यात या दुर्घटनेची नोंद करण्यात आली आहे.

UNIVERSAL PRIME ALUMINIUM LIMITED

CIN: L28129MH1971PLC015207
Regd. Office: Century Bhavan, 771 Dr A B Road, Worli, Mumbai, Maharashtra – 400 025, India. **Phone:** 022- 24307437/24304198
Website: www.universalprime.in **Email Id:** upalbby@gmail.com

NOTICE

The notice is hereby given that:

1. 49th Annual General Meeting ("AGM") of the Company will be held on Saturday, September 25, 2021 at 1:00 p.m. IST through video conferencing / other audio-visual means ('OAVM') facility pursuant to the MCA general circular no. 02/2021 dated January 13, 2021 read with general circular no. 20/2020 dated May 05, 2020 to transact the businesses, as set out in the Notice of AGM;
2. Annual Report for F.Y. 2020-21 have been sent to all the members by electronic means on their registered email Id as prescribed by MCA. The same is also available on the Company's website www.universalprime.in . The dispatch of Annual Report has been completed on Friday, September 3, 2021.
3. Members holding shares either in physical form or in dematerialized form, as on the cut-off date Saturday, September 18, 2021, may cast their vote electronically on the ordinary business as set out in the Notice through electronic voting system through remote e-voting. All the members are informed that:
   i. the remote e-voting shall commence on Wednesday, September 22, 2021 at 9.00 a.m. and shall end on Friday, September 24, 2021 at 5.00 p.m.;
   ii. any person, who acquires shares of the Company and becomes member of the Company after dispatch of the Notice of AGM and holding shares as on the cut-off date may obtain the login ID and password by sending a request at helpdesk.evoting@cdslindia.com. However, if a person is already registered with CDSL for e-voting then existing user ID and password can be used for casting vote;
   iii. members may note that: a) the remote e-voting module shall be disabled by CDSL after the aforesaid date and time for voting i.e., e-voting shall not be allowed beyond 5.00 p.m. on Friday, September 24, 2021 and once the vote on a resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently; b) Since the AGM will be convened through VC/ OAV, the facility for voting through physical ballot paper will not be made available, however members may cast their vote through e-voting which will be made available at the time of the AGM; c) the members who have cast their vote by remote e-voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again; and d) a person whose name is recorded in the register of members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date only shall be entitled to avail the facility of remote e-voting as well as voting at the AGM through OAVM facilities;
   iv. In case you have any queries or issues regarding attending AGM & e-voting, you may refer the Frequently Asked Questions ("FAQs") and e-voting manual available at www.evotingindia.com. or call on Toll Free No.: 18002005533 or write an email at helpdesk.evoting@cdslindia.com or contact Mr. Nitin Kunder (022-23058738) or Mr. Mehboob Lakhani (022-23058543) or Mr. Rakesh Dalvi (022-23058542) who will address the grievances connected with the voting by electronic means. Members may also write to the Company at upalbby@gmail.com or at the Registered Office address.
4. Pursuant to Section 91 of the Companies Act, 2013 read with Rules made thereunder, notice is also hereby given that the Register of Members of the Company and Share Transfer Books will remain closed from Saturday, September 18, 2021 to Saturday, September 25, 2021 (both days inclusive) for the purpose of Annual General Meeting.

By order of the Board of Directors
For Universal Prime Aluminium Limited
Sd/-
Nawal Kishor Bagri
Director

Date: September 4, 2021
Place: Mumbai

रॉयल कुशन व्हीनायल प्रॉडक्टस लिमिटेड

सीआयएन क्र.: एल२४११०एमएच१९८३पीएलसी०३१३९५
"श्लोक" ६० सीडी, गव्ह. इंडस्ट्रीउल इस्टेट, चारकोप,
कांदिवली (प), मुंबई ४०००६७ दूर: + ९१ २२
२८६०३५१४, १६ संकेतस्थळ: www.rcvp.in ;
ई-मेल आयडी: legalho83@gmail.com

व्हिडियो कॉन्फरसिंग किंवा अदर ऑडियो व्हिज्युअल मिन्स द्वारे आयोजित ३७ (सदतीस) व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या संदर्भात माहिती – सभासदांना सूचना

कोविड १९ चा चालू असलेला उद्रेक लक्षात घेता सामजिक अंतर राखण्याच्या संदर्भात आणि देशामध्ये आणि विविध ठिकाणी वैयक्तिक लोकांच्या हालचालींवर आलेली बंधने आणि सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की कंपनी कायदा, २०१३ च्या ("दि कायदा") आणि त्याच्या अंतर्गत करण्यात आलेले नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन आणि डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ (सेबी लिस्टिंग नियमावली), कंपनी व्यवहार मंत्रालयाच्या द्वारे जारी करण्यात आलेय साधारण परिपत्रक क्र. १४/२०२०, १७/२०२० आणि २०/२०२० दिनांकित अनुक्रमे एप्रिल ८, २०२०, एप्रिल १३, २०२० आणि मे ५, २०२० आणि स्पष्टीकरण ०२/२०२१ दिनांकित जानेवारी १३, २०२१ आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ द्वारे जारी करण्यात आलेल्या परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांकित मे १२, २०२० च्या अनुषंगाने आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या संदर्भात सेक्रेटरीयल स्टँडर्ड २ च्या तरतुदीच्या अनुसार रॉयल कुशन व्हीनायल प्रॉडक्टस लिमिटेड (दि कंपनी) च्या सभासदांना कळविण्यात येत आहे की एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या व्यवसायावर विचार करण्यासाठी एका सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय व्हिडियो कॉन्फरसिंग (व्हिसी) / अदर ऑडियो व्हिज्युअल मिन्स (ओएव्हीएम) द्वारे गुरुवार, सप्टेंबर ३०, २०२१ रोजी दु. १२.३० वा. (भाप्रवे) आयोजित करण्यात आली असून त्याची सूचना सर्व सभासदांना योग्य वेळी पाठविण्यात येणार आहे. एजीमेचे आयोजन उपरोक्त नमूद परिपत्रकामध्ये आणि कायदा आणि नियमावलीच्या तरतुदीमध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदीच्या अनुसर करण्यात अली आहे. उपरोक्त नमूद परिपत्रकांच्या अनुसार ३७ वी एजीएमची सूचना आणि त्यासोबत कायद्याच्या कलम १०२ च्या अंतर्गत स्पष्टीकरण निविदेन आणि मार्च ३१, २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी लेखा परीक्षित एकमेव वित्तिय निवेदन, त्यावरील संचालक मंडळाचा आणि लेखा परीक्षकांचा अहवाल (संयुक्तपणे वार्षिक अहवाल असा संदर्भ असलेले) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अशा सभासदांना ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनी/ डिपॉझिटरी पार्टीसिपंट/ रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ह्यांच्याकडे केली आहे त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे पाठवण्यात येणार आहे. सभासदाना एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवालाच्या प्रत्यक्ष प्रती पाठवल्या जाणार नाहीत. वार्षिक अहवालाच्या सोबत सूचनेची प्रत कंपनीच्या www.rvcp.in ह्या संकेतस्थळावर आणि कंपनीचे समभाग ज्या ठिकाणी सूचीबद्ध आहेत अशा स्टक एक्स्चेंजच्या संकेतस्थळावर म्हणजेच बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल)च्या www.evoting.nsdl.com ह्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. एमसीए परीपत्रके आणि सेबी परिपत्रके ह्यांच्या अनुसार सभासद ज्यानी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केलेली नाही त्यांना विनंती करण्यात येत आहे की वार्षिक अहवाल/ लॉग इन अधिकारपत्रे ई-मेल वर प्राप्त करण्यासाठी कारण प्रत्यक्ष प्रती पाठविण्यात येणार नसल्यामुळे खाली देण्यात आलेल्या प्रक्रियेच्या अनुसार नोंदणी करण्यात यावी.

समभागधारक ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा केली आहे	समभाग धारक ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा केली आहे आणि त्यांचं ई-मेल आयडीची नोंद केली नाही त्यांना विनंती करण्यात येत आहे की त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनी आरटीए, युनिव्हर्सल कॅपिटल सिक्युरिटीजप्रायव्हेट लिमिटेड ह्यांना info@unisec.in वर विनंती करणारे पत्र, फोलियो क्रमांक, स्कॅन करण्यात आलेली भाग प्रमाण पत्राची प्रत, स्वसाक्षांकित पॅन आणि आधार कार्डची प्रत आणि अन्य कागदपत्रे जसे की चालक परवाना, पासपोर्ट बँक खाते निवेदन, आधार च्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात.
अप्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा करणारे सभासद	अप्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा करणाऱ्या सभासदांना विनंती करण्यात येत आहे की त्यानी संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट ह्यांच्याकडे करावी.

कंपनी आणि आरटीए हे एनएसडीएलशी समन्वय साधतील आणि उपरोक्त नमूद समभागधारकांना लॉग इन अधिकार पत्रे समभागधारकांकडून आवश्यक कागदपत्रे आणि माहिती प्राप्त झाल्या नंतर उपलब्ध करून देण्यात येईल. त्याशिवाय, समभाग धारकांकडून कंपनीच्या इन्व्हेस्टर आयडीवर म्हणजेच legalho83@gmail.com वर मेल प्राप्त झाले असलयास एजीएमची सूचना अन वार्षिक अहवाल सभासदांना पाठविण्याची व्यवस्था कंपनी द्वारे करण्यात येईल. इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे मतदान (ई-मतदान) सभासद केवळ व्हिसी/ ओएव्हीएमद्वारे एजीममध्ये सहभागी होऊ शकतात. एजीएममध्ये सहभागी होण्यासाठी/ हजर राहण्यासाठी सूचना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आले आहे. आणि एजीएममध्ये सहभागी होणाऱ्या सभासदांची मोजणी कायद्याच्या कलम १०३ च्या अंतर्गत गणपूर्तीसाठी करण्यात येईल. कंपनीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी पार्टीसिपंत ह्यांची नियुक्ती केली आहे. तसेच सदर संस्थेकडून व्हिसी/ ओएव्हीएमची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रत्यक्ष स्वरूपात आणि अप्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा करणारे सभासद आणि ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केली नाही त्यांना एजीएंच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आल्या नुसार नोंद करण्याची विनंती करण्यात येत आहे. कोणतीही समस्या असल्यास सभासद फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन (एफएक्यू) चा किंवा https://www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शन मध्ये उपलब्ध असलेल्या ई-मतदान यूजर मन्युअलचा संदर्भ घेता येईल किंवा श्रीमती पल्लवी डहाके व्यवस्थापक ह्यांच्याशी टोल फ्री क्र. १८००- १०२०-९९० चा संदर्भ घेता येईल.

संचालक मंडळाच्या आदेशाच्या द्वारे
रॉयल कुशन व्हिनायल प्रडक्टस लिमिटेड करीता
सही/-
दीप्ती पारेख
कंपनी सचिव

दिनांक: सप्टेंबर ०३, २०२१
ठिकाण: मुंबई

मुक्ता ॲग्रीकल्चर लिमिटेड

agriculture MUKTA
४०१/ए, पर्ल आर्केड, पी.के. ज्वेलर्स समोर, दाऊद बाग लेन, ऑफ जे. पी. रोड, अंधेरी (प), मुंबई–४०००५८, **दूर.:** ०२२-२६७७८१५५ **फॅक्स:** २६७८११८७
सीआयएन: एल०१४०३एमएच२०११पीएलसी२१३८७
ई-मेल: mukta.agriculture@gmail.com
संकेतस्थळ: www.mukta-agriculture.com

१० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, ई-मतदान माहिती आणि बुक क्लोझर

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की मुक्ता ॲग्रीकल्चर लिमिटेडच्या सभासदांची १० वी वार्षिक सर्व साधारण सभा (एजीएम) कंपनी कायदा, २०१३ च्या ('कायदा') च्या लागू असलेल्या तरतूदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांच्या आणि एमसीए द्वारे जारी करण्यात आलेली साधारण परिपत्रके क्र. १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२०, आणि ०२/२०२१ अनुक्रमे दिनांकित ०८/०४/२०२०, १३/०४/२०२०, ०५/०५/२०२० आणि १३/०१/२०२१ आणि सेबी द्वारे पारीत परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांकित १२/०५/२०२० आणि परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दिनांकित १५/०१/२०२१ सह वाचल्या जाणाऱ्या सेबी नियमावली, २०१५ च्या अनुसार सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या व्यवसायावर विचार करण्यासाठी का्व्हिडियो कॉन्फरसिंग (व्हिसी)/ अन्य दृक श्राव्य माध्यमाद्वारे (ओएव्हीएम) सोमवार, २७ सप्टेंबर २०२१ रोजी दु. १२.३० वा. घेण्यात येणार आहे.

कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १८ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा १०१, लिस्टिंग ऑब्लिगेशन, सर्वसाधारण सभेच्या (एसएस-२) वरील सेक्रेटरियल स्टँडर्डच्या अनुसार आणि एमसीए आणि सेबी परीपात्राकांच्या अनुसार १० व्या एजीएमची सूचना वार्षिक अहवाल २०२०-२१ सोबत ई-मेल द्वारे अशा सर्व सभासदांना ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनी किंवा रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंट (आरटीए) किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट ह्यांच्याकडे करण्यात आली आहे त्यांना एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्राकाच्या अनुसार ई-मेल द्वारे पाठविण्यात आली आहे. एमसीए आणि सेबी परीपत्राकांच्या अनुसार १० व्या एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत सभासदांना पाठविण्यात येणार नाही.

सभासदांना ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की वार्षिक अहवालासोबत १० व्या एजीएमची सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.mukta-agriculture.com आणि स्टॉक एक्स्चेंजच्या म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bse.india.com आणि एनएसडीएलच्या म्हणजेच www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहे.

कंपनी त्यांच्या सभासदाना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करता यावे ह्यासाठी दूरस्थ ई-मतदानाच्या द्वार त्यांचे मतदान केलेले नाही त्यांच्यासाठी एजीएमच्या दरम्यान मतदानासाठी ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कंपनीने दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या ठिकाणी ई-मतदान सुविधा पुरवण्यासाठी एनएसडीएलसोबत कंपनीने करार केला आहे. सभासद ज्यांची नावे कट ऑफ दिनांक बुधवार, २०.०९.२०२१ अनुसार सभासदांची नोंदवही/ लाभार्थी मालकांच्या नोंदवही मध्ये आले आहेत त्यांना दूरस्थ ई-मतदान सुविधेचा किंवा एजीएमच्या दरम्यान ई-मतदानाचा वापर करता येईल.

दूरस्थ ई-मतदानाची शुक्रवार, २४.०९.२०२१ रोजी (स. ९.०० वा.) सुरवात होईल आणि मंगळवार, २६.०९.२०२१ रोजी (सायं. ५.०० वा.) समाप्त होईल. सदर कालावधीच्या दरम्यान कंपनीच्या सभासदांना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या बाबींवर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मतदान करता येईल. सभासदाच्या एकदा एखाद्या ठरावावर मतदान करण्यात आल्या नंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. सभासदांच्या मतदानाचा अधिकार त्याने कट ऑफ दिनांक म्हणजेच २०.०९.२०२१ अनुसार कंपनीच्या भरणा करण्यात आलेल्या समभागांच्या प्रमाणामध्ये करण्यात येईल. एजीएमच्या सूचनांचा भाग असलेल्या टिपांमध्ये दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या दरम्यान ई-मतदान संबंधी तपशिल देण्यात आला आहे. केवळ असे सभासद जे व्हिसी किंवा ओएव्हीएमद्वारे एजीएममा हजर आहेत आणि दूरस्थ ई-मतदानाच्या द्वारे ठरावांवर त्यांचे मतदान केलेले नाही किंवा तसे करण्यापासून प्रतिबंधित करण्यात आलेले नाहीत ते १० व्या एजीएमच्या दरम्यान उपलब्ध असलेल्या ई-मतदान सुविधेद्वारे मतदान करण्यास पात्र आहेत.

सभासद ज्यांनी त्यांचे मतदान दूरस्थ ई-मतदानाच्याद्वारे केले आहे ते एजीएमला देखील हजर राहू शकतात. तथापि, एजीएमच्या ठिकाणी परत मतदान करण्यास ते पात्र नसतील. कोणीही व्यक्ती ज्याने एजीएम सूचना ई-मेलद्वारे पाठविण्यात आल्यानंतर सभासद झाले आहेत आणि कट ऑफ दिनांकाच्या अनुसार भाग धारणा केली आहे त्यांना त्याचा युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्यासाठी evoting@nsdl.co.in वर मेल करावे लागेल. सभासद ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केलेली नाही त्याना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी 'ई-मतदानासाठी लॉग इन अधिकारपत्र प्राप्त करण्यासाठी डपझिटरी/ कंपनी / आरटीए ह्यांच्याकडे त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद १० व्या एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या प्रकाराद्वारे करावी.

कोणतीही समस्या असल्यास सभासद फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन (एफएक्यू) चा किंवा https://www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शन मध्ये उपलब्ध असलेल्या ई-मतदान यूजर मन्युअलचा संदर्भ घेता येईल किंवा टोल फ्री क्र. १८००-१०२०-९९०/ १८००-२२-४४३० चा संदर्भ घेता येईल.

कायद्याच्या कलम ९१ आणि लिस्टिंग नियमावलीच्या नियम ४२ च्या अनुषंगाने १० व्या एजीएमच्या कारणासाठी सभासदांची नोंद वही आणि कंपनीची भाग हस्तांतरण वही मंगळवार २१.०९.२१ पासून सोमवार, २७.०९.२०२१ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद ठेवण्यात येईल.

मुक्ता अग्रीकल्चर लिमिटेड साठी
सही/-
मोहीत खादारीया
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०५१४२३९५

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०४.०९.२०२१

मायस्टिक इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड साठी

electronics MYSTIC
४०१/ए, पर्ल आर्केड, पी.के. ज्वेलर्स समोर, दाऊद बाग लेन, ऑफ जे. पी. रोड, अंधेरी (प), मुंबई–४०००५८, **दूर.:** ०२२-२६७७८१५५ **फॅक्स:** २६७८११८७
सीआयएन: एल७२३००एमएच२०११पीएलसी२२१४४८
ई-मेल: electronics.mystics@gmail.com **संकेतस्थळ:** www.mystic-electronics.com

१० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, ई-मतदान माहिती आणि बुक क्लोझर

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की मायस्टिक इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड च्या सभासदांची १० वी वार्षिक सर्व साधारण सभा (एजीएम) कंपनी कायदा, २०१३ च्या ('कायदा') च्या लागू असलेल्या तरतूदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांच्या आणि एमसीए द्वारे जारी करण्यात आलेली साधारण परिपत्रके क्र. १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२०, आणि ०२/२०२१ अनुक्रमे दिनांकित ०८/०४/२०२०, १३/०४/२०२०, ०५/०५/२०२० आणि १३/०१/२०२१ आणि सेबी द्वारे पारीत परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांकित १२/०५/२०२० आणि परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दिनांकित १५/०१/२०२१ सह वाचल्या जाणाऱ्या सेबी नियमावली, २०१५ च्या अनुसार सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या व्यवसायावर विचार करण्यासाठी व्हिडियो कॉन्फरसिंग (व्हिसी)/ अन्य दृक श्राव्य माध्यमाद्वारे (ओएव्हीएम) सोमवार, २७ सप्टेंबर २०२१ रोजी दु. १२.०० वा. घेण्यात येणार आहे.

कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १८ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा १०१, लिस्टिंग ऑब्लिगेशन, सर्वसाधारण सभेच्या (एसएस-२) वरील सेक्रेटरियल स्टँडर्डच्या अनुसार आणि एमसीए आणि सेबी परीपात्राकांच्या अनुसार १० व्या एजीएमची सूचना वार्षिक अहवाल २०२०-२१ सोबत ई-मेल द्वारे अशा सर्व सभासदांना ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनी किंवा रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंट (आरटीए) किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट ह्यांच्याकडे करण्य